CNR NO.MHSO060003012023

**विशेष दिवाणी दावा क्र.३५/२०२३**

नागनाथ ताठे देशमुख

**वि.**

लिलावती जाडकर, वगैरे

## निशाणी क्रमांक २६ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज मयत वादीचे वारस यांनी त्यांना दाव्यामध्ये समाविष्ठ करण्यासाठी तसेच त्या अनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे कथन आहे की, वादी नागनाथ गणपतराव ताठे–देशमुख हे दिनांक २८.०९.२०२४ रोजी मयत झालेले आहेत. त्यांचे वारस समिरन नागनाथ ताठे हे देखील दि.१३.१२.२०२४ रोजी मयत झालेले आहेत. त्यांना अर्जदार हे वारस आहेत. मयत नागनाथ ताठे यांनी प्रस्तुतचा दावा साठेखतावरुन खरेदीखत होवुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे त्यांचे पश्चात त्यांच्या वारसांना दावा पुढे चालविण्याचा हक्क प्राप्त झालेला आहे. अर्जदार हे मयत समिरन ताठे यांचे वारस म्हणुन दावा चालविण्यास तयार आहेत. करिता, त्यांना दाव्यामध्ये मयत वादीचे वारस/पक्षकार म्हणुन समाविष्ठ करण्याची परवानगी व त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी.

३. प्रतिवादींनी अर्जास हरकत घेतली. प्रतिवादींनी कथन केले की, अर्ज कायदेशीर नाही. अर्जदाराने तिच्या म्हणण्यापुष्ट्यर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. करिता, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे विचारात घेण्यात आले. निशाणी क्र.३१ वरील यादीसोबत दाखल मृत्यु प्रमाणपत्र पाहिले. त्यावरुन असे दिसते की, समिरन ताठे यांचा

मृत्यु दि.१३.१२.२०२४ रोजी झालेला आहे. दावा हा करारपूर्तीसाठी मयत वादीने दाखल केलेला होता. दाव्याचे स्वरुप पाहता मयताचे वारसांना दावा पुढे चालविण्याचा हक्क प्राप्त होत असल्याचे दिसते. प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०६.०३.२०२५ रोजी अर्जदारांनी दाखल केलेला आहे. म्हणजेच अर्ज हा मुदतीत दाखल करण्यात आलेला आहे ही बाब स्पष्ट होते. करिता, उपरोक्त बाबी पाहता अर्ज मंजूर करणे योग्य होईल. करिता, खालील आदेश.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तावित वारसांना दाव्यामध्ये सहभागी होण्याची परवानगी देण्यात येते.

३. प्रस्तावित वादींनी दाव्यामध्ये दुरुस्ती करुन विहित कालावधीत दुरुस्त वादपत्र तसेच हुकूमनाम्याची प्रत दाखल करावी.

स्वाक्षरीत/-

(नीलेश सु. बुद्रुक)

दि. २८.११.२०२५.

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

पंढरपूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same word to word as per the original.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Suresh M. Malkapalli |
| (b) | Court | : | Jt. Civil Judge (S.D.), Pandharpur. |
| (c) | Signed by P.O. On | : | 28.11.2025 |
| (d) | Uploaded on | : | 01.12.2025 |